# ‘मधमाश्या वाचवा, निसर्ग वाचवा,’

## दयानंद यांची मधमाश्या संरक्षणासाठी धडपड; मोफत काम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : मधमाश्यांचे पोळं पाहिलं तरी धडकी भरते, एखादी माशी चावली तर या विचाराने अंगावर काटा येतो, त्यामुळे मधाचे पोळे काढण्यासाठी त्याला धूर दिला जातो. प्रसंगी दिवटीने माश्या पेटविल्याही जातात. पर्यावरणातील महत्त्वाचा घटक असणाऱ्या मधमाश्यांना वाचविण्यासाठी दयानंद श्रीकांत पाटील हा पुढे आला आहे. ‘मधमाश्या वाचवा निसर्ग वाचवा,’ अशी साद देतो. तो विनाशुल्क मधमाश्यांचे पोळे काढण्यासाठी काम करत आहे. मधाचे पोळे काढत तो मधमाश्यांच्या संरक्षणाला अधिक महत्त्व देतो.

कणेरीमठ येथील दयानंद आठ वर्षे मधमाश्यां पालन व्यवसायात आहे. त्याने भूगोल व इतिहास विषयातून एम.ए.ची पदव्युत्तर पदवी मिळवली आहे. मधमाश्या परागीभवनातून पिकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात, याची जाणीव त्याला आहे. दाजीपूर, कणेरीमठ, शिवाजी विद्यापीठासह आणि ठिकाणी त्याच्या मधपेट्या आहेत. तो वर्षाकाठी पाचशे किलो मध उत्पादन घेतो.

त्याने प्रतिभानगर, रंकाळा, राजेंद्रनगर, मोरेवाडी, फुलेवाडी, देवकर पाणंद व शिवाजी विद्यापीठातील मधमाश्यांची पोळी अलगदरित्या काढली आहेत. मधमाश्यांचे पोळे काढताना मधमाश्या मरणार नाहीत, याची तो काळजी घेतो. तो म्हणतो, ‘मधमाश्यांची पोळी अहिंसक पद्धतीने काढणे महत्त्वाचे आहे. काहीजण पोळे काढताना स्प्रे व कीटकनाशकांचा वापर करतात. धूर देऊन माश्यांना बाजूला हाकलतात. तसेच चक्क मधाचे पोळे जाळून टाकतात, ही पद्धत अत्यंत चुकीची आहे.’



मधमाश्यांचे संरक्षितरीत्या पोळे काढताना दयानंद पाटील.

### एक कॉल करा; पोळे काढून घ्या

निसर्गातील मधमाश्या टिकविण्यासाठी त्याची धडपड आहे. त्यामुळेच तो विनाशुल्क मधमाश्यांचे पोळे काढण्यासाठी विनाशुल्क काम करत आहे. केवळ एक कॉल करा व मधमाश्या मधमाश्यांचे पोळे काढून घ्या, असे आवाहन तो करताना दिसतो.

**“ मधुमक्षिका पालन हा चांगला व्यवसाय आहे. तो कसा करावा, या संदर्भात विद्यापीठातर्फे कार्यशाळा घेतली जाते. मधमाश्यांबाबत लोकांत गैरसमज आहेत, ते दूर व्हावेत, हाही उद्देश आहे. निसर्गातून मधमाश्या नष्ट होणे मानवी जीवनाला परवडणारे नाही. त्यांचे संरक्षण करणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे.**

**- डॉ. ए. डी. जाधव,** प्राणीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ

e Sakal
व्हिडिओ पाहा

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचे वारणा विभाग शिक्षण मंडळातर्फे अभिनंदन

वारणानगर, ता. १८ : नॅकचे शिवाजी विद्यापीठाने ३.५२ सीजीपीए सह गुणाकानांसह ए. प्लस प्लस मानांकन प्राप्त केले. त्याबद्दल वारणा विभाग शिक्षण मंडळाने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांचा सत्कार मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांच्या हस्ते झाला. तात्यासाहेब कोरे (स्वायत्त) अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. व्ही. आणेकर उपस्थित होते.

Kolhapur, Main
19/04/2021 Page No. 2